


मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे चिपळूणमधील रेणुका माता नागा लेडिज वसतिगृहाला किराणा सामान भेट देण्यात आले.

## मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे दरमहा किराणा सामान देणार

# रेणुका माता नागा लेडिज वसतिगृहाला मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**रत्नागिरी :** जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यात रेणुका माता नागा लेडिज वसतिगृह असून, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती हा प्रकल्प चालवत आहेत. यामध्ये भारताच्या ईशान्येकडील भागातील मुलींना चिपळूण येथे आणून त्यांना या प्रकल्पांतर्गत शिक्षण, वसतिगृह, भोजन यांची सोय केली जाते. याचा उद्देश त्या भागातील धर्मांतर, स्थानिक संस्कृती आणि आदिवासींच्या कलांच्या संरक्षणासाठी स्थापन करण्यात आला आहे. याचाच एक भाग म्हणून मुकुल माधव फाऊंडेशन व फिनोलेक्स कंपनी यांच्याकडून या प्रकल्पांतर्गत मणिपूर आणि नागालँडमधील १८ मुलींसाठीचा किराणा खर्च उचलला असून, चिपळूण येथे रेणुका माता नागा वसतिगृहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन चिपळूणच्या नगराध्यक्ष सुरेखा खेराडे आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. ज्योती यादव यांच्या हस्ते झाले. महिला सप्ताह उत्सवाचा एक भाग म्हणून या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले होते. तसेच मंदार लेले, सचिव आणि प्राजक्ता ओक समन्वयक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि राष्ट्रीय सेविका समितीच्या स्वयंसेवक, श्रीमती गोखले, नगरसेविका चिपळूण आणि नागालँड व मणिपूर येथील विद्यार्थिनी या कार्यक्रमास उपस्थित होत्या.

या प्रकल्पामुळे नागालँड आणि मणिपूरमधील १८ मुलींना त्यांच्या रोजच्या आहारातील गरजा भागविल्या जातील. खेराडे आणि डॉ. ज्योती यादव यांनी किराणा देण्याच्या या उदार देणगीचे मुकुल माधव फाऊंडेशन व फिनोलेक्स कंपनीचे कौतुक केले. तसेच सर्व मुलींदेखील खूप आनंदित झाल्या.